INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018 Special Issue – LXV

Chief Editor : Dr. Dhanraj Dhangar
Assistant Professor,
Dept. of Marathi,
MGV's Arts and Commerce College, Yeola
Dist. Nashik (M.S.) India.

Executive Editors :

- Mr. Ananta Kasture, Head, Dept. Of Marathi, Smt. Meenalben Mehata College, Pachgani
- Mr. Manik Wangikar, Asst. Professor, Smt. Meenalben Mehata College, Pachgani
- Mr. Vaman Sargar, Asst. Professor, Smt. Meenalben Mehata College, Pachgani
- Mr. Santosh Bandgar , Asst. Professor, Smt. Meenalben Mehata College, Pachgani

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC) List No. 40705
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- Indian Citation Index (ICI)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | अंधेरनगरी : एक आकलन | – प्रा. दत्ता जाधव | 94 |
| 25 | भ्रष्टाचारी व्यवस्थेचे प्रतिक 'ऑक्टोपस' | – प्रा. रघुनाथ गवळी | 97 |
| 26 | लक्ष्मीकांत देशमुखांच्या 'हरवलेले बालपण' | – निलम पाटील | 101 |
| 27 | ल. देशमुख यांच्या 'इन्किलाब विरूद्ध जिहाद' कादंबरीतील सामाजिक जीवन | – रविंद्र शिंदे | 110 |
| 28 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे कथासाहित्य | – प्रा. अमर तांबे | 112 |
| 29 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे कथासाहित्य | – प्रा.डॉ. गणेश मोहिते व प्रा. संदीप परदेशी | 117 |
| 30 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे कथासाहित्य | – प्रा. गौतम जाधव | 121 |
| 31 | ल. देशमुख यांच्या कादंबऱ्यातील राजकीय प्रशासकीय चित्रण | –डॉ. वैभवी टेहुकर | 125 |
| 32 | लक्ष्मीकांत देशमुखांच्या कथांची चिकित्सा | – प्रा.डॉ. उल्हास मांगलेकार | 128 |
| 33 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे कथासाहित्य | – प्रा. संतोष वोंगाळे | 133 |
| 34 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथांमधील स्त्री | – प्रा. विजय शिंदे | 137 |
| 35 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या पाणी! पाणी!! कथासंग्रहातील स्त्री चित्रण | – प्रा अनुसया इमडे | 141 |
| 36 | 'उदक' मधील पाणी समस्या – वास्तवाची सत्यता | – प्रा. डॉ. अनुराधा मुळे | 146 |
| 37 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी' कथासंग्रहातील स्त्री पुरुष प्रमाण: वास्तवता– प्रा. गजाराम कांबळे | | 149 |
| 38 | 'गाव विकणे आहे'–संवेदनशिलतेचा प्रत्यय देणारा मर्मग्राही कथासंग्रह | – प्रा.डॉ. भरत जाधव | 154 |
| 39 | 'पाणी! पाणी!!' कथासंग्रहातून अभिव्यक्त झालेली दुष्काळाची धग | – प्रा. भीमराव वानोळे | 161 |
| 40 | 'आकाश जिंकणार मी' मधील खेळाडूंच्या जीवनसंघर्षाचे चित्रण | – प्रा. वामन सरगर | 168 |
| 41 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथेतील दुष्काळ | – डॉ. दिनकर कुटे | 171 |
| 42 | 'माणुस नावाचं एकाकी बेट' मधील स्त्रीवादाचे स्वरूप | – प्रा.डॉ. सविता व्हटकर | 175 |
| 43 | 'माणुस नावाचं एकाकी बेट' –आधुनिक जगण्याचे प्रतिबिंब | – प्रा शुभांगी आसोलकर | 182 |
| 44 | रोजगार हमी योजनांचा फोलपना– 'पाणी! पाणी!!' | – प्रा. तुकाराम भवर | 186 |
| 45 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथेतील जलभान | – प्रा. डॉ. किसन माने | 192 |
| 46 | 'कथांजली' कथासंग्रहातील निवडक कथांचे मानसशास्त्रीय विश्लेषण | – प्रा. शिवराम मेस्त्री | 198 |
| 47 | 'गाव विकणे आहे – असंख्य वर्तमानाची स्पंदनं | – डॉ. गणराम पोटे | 202 |
| 48 | आजच्या ग्रामीण वर्तमानाची कथा– 'पाणी! पाणी!!' | – प्रा.डॉ. संतोष लावंड | 209 |
| 49 | आराधर्मी नाटककार ल. देशमुख: 'अखंड गत्र' च्या अनुषंगाने | – साजिदा आरवडे | 213 |
| 50 | नाटककार लक्ष्मीकांत देशमुख | – प्रा. डॉ सतेज दणाणे | 215 |




Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 65 : [illegible]
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
October-2018

# लक्ष्मीकांत देशमुख यांचे कथासाहित्य

डॉ. गणेश मोहिते [illegible]
प्रा. संदीप परदेशी [illegible]

प्रस्तावना :

साहित्य हा समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते. 'साहित्यकृती' निर्माण होत असताना लेखक, त्याचा परिसर, त्याच्यावर आलेल्या संस्कारांचे, संस्कृतीचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. म्हणूनच कोणतीही साहित्यकृती स्वयंभू असते. त्यामुळे निरनिराळ्या प्रकृती या त्यांच्या प्रत्येक साहित्यकृती वेगवेगळ्या ठरतात. अशाच अनेकविध विषयांवर साहित्यलेखन करणारे महाराष्ट्रातील लेखक, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष 'लक्ष्मीकांत देशमुख' हे आज साहित्य क्षेत्रातील परिचित नाव ठरतात.

प्रशासनात कार्य करत असतांना वेगवेगळ्या समाजघटकांशी आलेला संबंध, त्यातून आलेले वेगवेगळे अनुभव या अनुभवांना प्रकट करण्याची क्षमता काहीच निवडक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दाखविली. त्यात या कालखंडात 'लक्ष्मीकांत देशमुख' हे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

समाजजीवनातील वेगवेगळ्या स्तरातील माणसांच्या समस्या, सुख–दुःख, जीवनानुभव यांना मूर्तरूप देण्याचे काम त्यांनी अतिशय संयत व प्रगल्भपणे केले आहे. तसेच प्रशासनाच्या अनुषंगाने प्रत्येक ठिकाणी विविध समस्या/प्रश्न घेऊन येणारी माणसे, त्यांचे प्रश्न व त्यांच्या प्रश्नावर काढलेला तोडगा हा त्यांच्या लेखनाचा महत्वाचा दुवा आहे. एकुणच लेखनाच्या बाबतीत प्रशासनात त्यांच्यामधला अधिकारी जेवढा सजग आहे तेवढाच त्यांच्यातील लेखकही आहे. म्हणूनच लोकशिक्षकाची एक समर्थ भूमिकाही त्यांच्याजवळ आहे.

विविध वाङ्मयप्रकार हाताळत असताना आशय, विषय व शैली यांचे नानाविध प्रयोग त्यांनी लेखनातून केले आहे. समाजजीवनाचा भाष्यकार म्हणून त्यांच्या कथात्मलेखनाची चर्चा मराठी साहित्यात आहे.

सुक्ष्म निरीक्षणशक्ती, अतिशय तरल संवेदना, अनुभवातून जीवनाचा अन्वयार्थ लावण्याची तटस्थ वृत्ती आणि त्या अनुभवाला साहित्यरूप देण्यासाठीची खास लेखनशैली यामुळे त्यांच्या लेखनाला मोठ्या प्रमाणावर वाचकवर्ग लाभला. आपल्या लेखनातून विषयांचे वैविध्य जपत त्यांनी तो टिकवला व लेखनातले प्रमाणावर वाचकवर्ग लाभला. आपल्या लेखनातून विषयांचे वैविध्य जपत त्यांनी तो टिकवला व लेखनातले सातत्य ही राखले. म्हणूनच आजच्या महत्वाच्या साहित्यकारांमध्ये त्यांची गणना होते.

समकालिन राजकारणाचे, समाजकारणाचे व प्रशासकीय व्यवस्थेचे अंतर्भेदी चित्रण त्यांच्या वाङ्मयात आहे. पाणीप्रश्न, स्त्रीभ्रूणहत्या, बालमजूरांचा प्रश्न ते आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंतचा अवकाश त्यांनी लेखनातून व्यापला आहे. मानवतावाद आणि वास्तववाद या दोहोंची परंपरा सांगणारे त्यांचे लेखन चिंतनीय आहे.

लक्ष्मीकांत देशमुख यांनी वाङ्मयाच्या विविध प्रकारात लेखन केले आहे. यात कथा, कादंबरी, नाटक, प्रशासनपर साहित्य व ललित लेखनाचा समावेश आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथालेखनाचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

लक्ष्मीकांत देशमुख यांचे कथासाहित्य :–

लक्ष्मीकांत देशमुख यांचे एकुण सात कथासंग्रह प्रकाशित आहेत –



Scanned by CamScanner

१) कथांजली २) अंतरीच्या गूढगर्भी ३) पाणी! पाणी !! ४) नंबर वन ५) सावित्रिच्या गर्भात मारलेल्या लेकी ६) आंतरपथ आणि मृगतृष्णा ७) पाच पिढ्या आणि

लक्ष्मीकांत देशमुखांनी नगरच्या साप्ताहिक--नगरच्या मराठवाड्यातून कथालेखनाला सुरुवात केली. त्यांच्या काही कथा सा. साधना, साप्ताहिक स्वराज्यापासून शालेय नियतकालिकांत प्रकाशित झाल्या आहेत. पण संग्रहाच्या रूपाने त्यांच्या कथेचे पहिले पुस्तक 'अंतरीच्या गूढगर्भी' सन १९९५ मध्ये प्रकाशित झाले.

१) 'आंतरीच्या गुढगर्भी' या संग्रहातील संपूर्ण कथा प्रेमानुभवाच्या विविध छटा व्यक्त करणाऱ्या आहेत. गुढता, सहजता, शरीरधर्म, नातेसंबंध, आठवणी आणि भावव्याकुळता अशा अनेकविध मानवी भावावस्था 'प्रेम' या विषयाला केंद्रस्थानी ठेवून त्यांनी अभिव्यक्त केल्या आहेत.

२) ''पाणी! पाणी!!'' हा देशमुखांचा दुसरा कथासंग्रह महत्वपूर्ण आहे. 'तहानलेल्या महाराष्ट्राच्या कथा' असे उपशीर्षक या संग्रहाला देण्यात आले आहे. या संग्रहाची पहिली आवृत्ती १९९७ ला 'उदक' या नावाने तर दुसरी आवृत्ती २००७ साली 'पाणी ! पाणी !! नावाने प्रकाशित झाली. यातील कथा या पाणी, दुष्काळ, शेती व कृषीसंस्कृतीवरील त्याचा परिणाम या विषयसूत्राभोवती केंद्रीत आहे. दुष्काळी प्रदेशाचे प्रत्ययकारी चित्रण, पाणी प्रश्नांचे राजकारण, असंख्य वृत्ती, प्रवृत्तीची भेटणारी धूर्त, लबाड, वेरकी माणसं,' सामाजिक आर्थिक विषमता, प्रादेशिक असमतोल, कृषीसंस्कृती आणि त्यातील प्रथा–परंपरा, खेडुत माणसांचे विविध पातळयांवरील शोषण, सुस्तावलेली सरकारी यंत्रणा, स्त्रीयांचे शोषण, बदलते राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ अशा बहुविध आशयसूत्राला व्यक्त करणाऱ्या कथा सकस आहेत.

पाणीचोर, लढवय्या या सामान्य शेतकऱ्याच्या संघर्षकथा आहेत. 'बांधा' ही नायिकाप्रधान तर 'भूकवळी' ही कथा सामाजिक विषमतेला अधोरेखित करणारी आहे.

(३) 'नंबर वन' हा आणखी एक लक्षवेधी कथासंग्रह आहे. खर तर मराठी कथेत हा प्रांत नवा आहे. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, महानगरीय चौकटीच्या पलिकडे विविध आशय–विषयाला स्पर्श करणारे लेखन अपवादानेच मराठीत झाले आहे. कला, साहित्य, संस्कृती, राजकारण, समाजकारण, शिक्षण, कृषी, विविध चळवळीतील नायक–नायिकांचे भावविश्व हा मराठी कथेचा नित्याचा भाग. परंतु या पलिकडे जाऊन क्रीडाक्षेत्रात बहुविध क्रीडा प्रकारातील खेळाडूंचे भावविश्व, त्यांच्यातील माणुसपण, त्या क्षेत्रातील विविध प्रकृती, अपप्रवृत्ती, खेळातील राजकारण, मैदानाबाहेरचे खेळाडूंचे विश्व अतिशय चित्रमय शैलीत शब्दचित्र रेखाटन करावे, अगदी त्याच पध्दतीने 'नंबर वन' मधील कथा आकाराला आल्या आहेत. 'नंबर वन' तसा प्रयोगच आहे. 'रियल हिरो' असणाऱ्या यशस्वी माणसांच्या यशामागील परिश्रम, सत्य, संघर्ष व त्यांची जीवनशैली समजावून घेण्याच्या दृष्टीने या कथा महत्वपूर्ण आहेत.

या संग्रहात एकूण दहा कथा आहेत. प्रत्येक कथेतून वेगळया खेळाचा वेध घेण्यात आला आहे.

४) 'सावित्रिच्या गर्भात मारलेलया लेकी' हा देशमुखांचा एक महत्वाचा कथासंग्रह आहे. या संग्रहातील आठ कथांमधून मानवी क्रौर्याची परिसीमा गाठणारी, धूर्त, लबाड, क्रूर, निदर्यी, निष्ठूर माणसं भेटतात. त्यांचे वर्तन, त्यांच्या धारणा, त्यांच्या सामाजिक रूढी– परंपरा त्यांचे जीवनाविषयीच्या सनातन–दृष्टीकोनाची अनुभूती तिरस्कार मनात येताना निर्माण होतो. वैद्यकिय व्यवसातील माणसांतील पशू, पुरुषप्रधान संस्कृतीच्या आहारी गेलेला २१ व्या शतकातील स्त्री–पुरुष, त्यांचे वर्तन व मनोधर्म वाचकाला अस्वस्थ करणारा आहे.



Scanned by CamScanner

या संग्रहातील शेवटची शीर्षक कथा गर्भात असणाऱ्या मुलींच्या हत्यांच्या माध्यमातून इथल्या समाजमनावरशेला हादरे देणारे प्रश्न उपस्थित करते. 'स्त्रीभ्रूण हत्या' या भीषण समस्येच्या मागे फक्त पुरुषप्रधान मानसिकता कारणीभूत आहे. याच मानसिकतेने असंख्य मुलींना गर्भातच नष्ट केले आहे. ''मुलगी नकोच नको. या पुरुषी मनोवृत्तीचा मारलेला हे व्यापक अर्थाने अधिक स्पष्ट आहे.'' (पृ. १३८) या मनोवृत्तीच्या परिवर्तनासाठी हा लेखन प्रपंच आहे. सामाजिक बदलाची प्रक्रिया मानसिकतेपासून सुरू होते. समाजाची मानसिकता बदलावी. 'नकोशी' वाटणारी मुलगी प्रत्येकाला हवी हवीशी वाटावी असा प्रगल्भ सामाजिक दृष्टीकोन देणारा हा कथासंग्रह महत्त्वपूर्ण आहे.

(५) ''अग्निपथ'' हा एक देशमुखांचा कथासंग्रह आहे. या संग्रहातून समकालिन राजकिय, सामाजिक–सांस्कृतिक क्षेत्रातील मूल्यऱ्हास व सामान्यांना करावा लागणारा महानगरांतील जीवनसंघर्ष चित्रित रूपात येतो.

'मृगतृष्णा' या कथासंग्रहातील कथा स्त्री–पुरुष संबंधाचे विविध पैलुंचे विविधांगी दर्शन घडविणारा आहे.

(६) 'गाव विकणे आहे' हा देशमुखांचा अलिकडेच प्रकाशित झालेला कथासंग्रह जागतिकिकरणाचे गावपातळीवर झालेले बरे–वाईट परिणाम अधोरेखित करतो. यातील दहाही कथा देशमुखांचे वर्तमानाशी नाते जोडणाऱ्या कष्टकरी वर्गाचे प्रतिनिधित्व करतात.

दुष्काळामुळे संबंध गाव विकण्यामागची मजबुरी, नक्षली जीवनाचे अंतरंग, गाव 'शिवाराला आलेली अवकळा आणि असंवेदनशील प्रशासन यामुळे सामान्य माणसाचे असहय झालेले जगणे या सर्वांचा वेध या कथांमधून घेतला आहे.

❖ कथासाहित्याचे विशेष :–

१) देशमुख यांच्या कथा या 'थीमबेस्ड' आहेत.
२) त्यांची कथा मध्यमवर्गीयांच्या चौकटीत न अडकता सामाजिक प्रश्नांभोवती केंद्रीत होऊन सामान्य माणसाच्या सुख–दु:खाची अभिव्यक्ती करू लागते.
३) 'प्रबोधन' मूल्याच्या वाहक असणाऱ्या या कथा माणसांना विशिष्ट सामाजिक प्रश्नांविषयी जागृत करण्याचे महत्वाचे कार्य करतात.
४) कथेचा स्थायीभाव लोककल्याणाचा आहे.
५) 'स्त्री' चे 'माणूस' म्हणून अस्तित्व नाकारणाऱ्या असंख्य वाटांवर विविध कथेतून 'पुरुष' असूनही त्यांनी प्रकाश टाकला आहे. हे ही विशेषत: नोंदवलेच पाहिजे.

❖ सारांश :–

एकुणच देशमुखांच्या कथा साहित्यातून सामाजिक जाणिवेची सकस अभिव्यक्ती 'समस्याकेंद्री कथा' रूपात त्यांनी केली आहे. विविध सामाजिक प्रश्नांच्या कलात्मक अभिव्यक्तीतून समाजाला नवीदृष्टी प्रदान करण्याबरोबरच आत्मचिंतन करायलाही भाग पाडतात.

म्हणूनच नव्वदनंतरच्या कालखंडात महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या कथालेखकांत 'लक्ष्मीकांत देशमुख' यांचे नाव प्राधान्यक्रमाने घ्यावे लागते.

संदर्भ ग्रंथ



Scanned by CamScanner